1

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2019 ◐ WS 277954

TREASURY OFFICE NASIK
5 MAR 2020
STPHC ATO

## प्रतिज्ञापत्र

मी, प्रतिज्ञापत्र करणार श्री. अनंत मल्हारी शिंदे वय ४६ वर्षे, धंदा : शेती व व्यवसाय, रा:- नाशिक, ता. जि. नाशिक, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

# फक्त प्रतिज्ञापत्रासाठी

प्रतिज्ञापत्र कोणाकडे सादर करावयाचे : मा. जिल्हाधिकारी साहेब

प्रतिज्ञापत्रासाठीचे कारण : परवानगी

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व रहिवासी पत्ता : अरुण मल्हारी शिंदे

A-17 उद्योग स्वामिनी MIDC अंबड नाशिक

मुद्रांक विक्री बाबतची नोंद वही अनु. क्रमांक व दिनांक : 23773 / 11/3/2020

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही :

परवाना क्रमांक ८७/१९५/२६,
मेघदुत शॉपिंग सेंटर, सीबीएस, नाशिक

१. मिळकतीचे वर्णन:- तुकडी जि. नाशिक व पोट तुकडी ता. दिंडोरी, मौजे पिंपळनारे या गावचे शिवारातील मिळकत, यासी गट/ सर्वे नं. ३४८, यासी क्षेत्र ०३ हे १७ आर + पो.ख. ०० हे ०३ आर , असे एकूण क्षेत्र ०३ हे २०आर, यासी आकार रु. ०४ .९४ पैसे.यासी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईट्स प्रमाणे.... या पैकी अर्जदार यांचे खरेदी मालकीचे क्षेत्र ०० हे २३ आर, यासी आकार रु. 0.७१ पैसे, यासी चतु;सिमा खालील प्रमाणे:-

पूर्वेस : या गटा पैकी लिलाबाई हिरामण ढिकले यांचे क्षेत्र

पश्चिमेस : यशवंत त्रिंबक खांदवे व इतर यांचे क्षेत्र

दक्षिणेस : गट/सर्वे नं. ३५६

उत्तरेस : ३४९

येणे प्रमाणे दरोबस्त मिळकत

२. वर नमूद केलेली मिळकत अर्जदार व इतर १ यांनी सौ. चंद्रकला उत्तम खांदवे यांचे कडून फरोक्त खरेदीखता अन्वये खरेदी घेतलेली आहे. सदर खरेदीखताचा दस्त में. दुय्यम निबंधक साहेब दिंडोरी यांचे कार्यालयात दिनांक ८/०८/२०१६ रोजी दस्त क्र. दडर नं.२४२९/२०१६ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे.सदर खरेदीखता अन्वये अर्जदार व इतर यांचे नाव सदर मिळकतीचे ७/१२ उत्ताऱ्या सदरी दाखल झालेले आहे.

३. वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत अर्जदार यांनी औद्योगिक प्रयोजनाकामी खरेदी केलेली असून, सदरची मिळकत विकास आराखड्यात औद्योगिक कारणाकरिता प्रास्तविक म्हणून समाविष्ठ आहे.

४. अर्जदार यांना सदर मिळकतीचा औद्योगिक प्रयोजनासाठी वापर सुरु करावयाचा असल्याकारणाने सक्षम अधिकारी(में. तहसीलदार साहेब ) यांचे परवानगीची आवश्यकता आहे.त्याकामी अर्ज दाखल केलेला आहे.

५. वर कलम १ मध्ये नमूद मिळकतीचे अनुषंगाने नाशिक येथील में. न्यायालयात व इतर कुठल्याही न्यायालयात दावा,वाद प्रलंबित नाही. तसेच सदर मिळकत रेल्वे स्थानक, कारागृंह, स्मशानभूमी यांचे पासून ३० मिटरचे आत नाही.

६. सदर कलम १ मध्ये नमूद मिळकती मध्ये विजेच्या उच्च दाबाच्या तारा वरून अथवा जमिनी पासून १५ मीटर पेक्षा कमी अन्त्रावृम्न जात नाही. त्याकामी सदरचे प्रतिज्ञापत्र करून देत आहे.

वर कलम १ ते ६ मध्ये नमूद केलेला संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेकामी मी माझी सही सदर लेखाखाली केली आहे.

हे, प्रतिज्ञापत्र,
ठिकाण : नाशिक
दिनांक : /०३/२०२०

......................................

श्री. अनंत मल्हारी शिंदे
(प्रतिज्ञापत्र करणार)